कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत "अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी" या पदावर "प्रतिनियुक्तीने नियुक्ती" देणेबाबत....

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य, रोजगार,उद्योजकता व नाविन्यता विभाग**
**शासन आदेश क्रमांक: कौविउ-२०२२ /प्र.क्र. ६२/कौ-१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १३ ऑक्टोंबर, २०२२

संदर्भ :- १. कौ.वि. व उ. विभाग, शासन निर्णय क्र. कौविउ-२०१५/प्र.क्र.१२२/ रोस्वरो-१, २ सप्टेंबर, २०१५.
२. कौ.वि. व उ. विभाग, शासन निर्णय क्र. कौविउ-२०१५/प्र.क्र.१९६/ प्रशा-१, दिनांक २४ फेब्रुवारी २०१६.
३. सा.प्र.वि., शासन निर्णय,क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.१३७/कार्या-१२/ दिनांक १७ डिसेंबर, २०१६.
४. सा.प्र.वि, शासन निर्णय,क्र.एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.५१०/कार्या-१२/ दिनांक १६ फेब्रुवारी, २०१८.

# शासन आदेश

कौशल्य, रोजगार,उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या आस्थापनेवर "विशेष कार्यकारी अधिकारी (उप सचिव दर्जा)" ची २ पदे निर्माण करण्यास सं.क्र.२ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

२. सा.प्र.वि.च्या उपरोक्त सं.क्र. ३ व ४ येथील शासन निर्णयांतील मार्गदर्शक सूचनांनुसार देण्यात आलेल्या जाहिरातीद्वारे "विशेष कार्यकारी अधिकारी (उप सचिव दर्जा)" या पदासाठी पात्र अधिकाऱ्यांची निवडसूची करण्यात आली.

३. या अधिकाऱ्यांमधूनच "अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी / महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी " या पदावर एकाची (विशेष कार्यकारी अधिकारी या २ पदांव्यतिरिक्त) नियुक्ती करण्यास सक्षम प्राधिकाऱ्याने तातडीची बाब म्हणून मान्यता प्रदान केलेली आहे. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे "प्रतिनियुक्तीने नियुक्ती" करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकारी | प्रतिनियुक्तीचे पद |
|---|---|---|
| १. | श्री अनिल सोनवणे<br>अति. मु. का. अ. / प्रकल्प संचालक, म.वि.से. | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी |

३. श्री अनिल सोनवणे, अति. मु. का. अ. / प्रकल्प संचालक, ग्राम विकास विभाग यांची प्रतिनियुक्ती तीन वर्षाच्या कालावधीसाठी खालील अटींच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

(अ) श्री अनिल सोनवणे हे ज्या तारखेला "अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी" या पदाचा कार्यभार स्विकारतील त्या तारखेपासून त्यांच्या प्रतिनियुक्तीच्या सेवेचा प्रारंभ होईल.

(ब) जर त्यांची सेवा लोकसेवेच्या दृष्टीने शासनाला आवश्यक वाटली तर प्रतिनियुक्तीचा कालावधी संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी परत बोलावून घेण्याचा अधिकारी शासन / सक्षम प्राधिकाऱ्यास राहील.

(क) त्यांच्या प्रतिनियुक्तीचा कालावधी संपण्यापूर्वी, जर त्यांची सेवा कौशल्य, रोजगार, उद्योजकता विभागास योग्य वाटली नाही तर, ती त्यांच्या मूळ विभागास सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने परत करण्यात येईल.

(ड) श्री अनिल सोनवणे यांना मूळ विभागाकडे परत जाण्याचा उद्देश असल्यास, असे त्यांनी किमान तीन महिने अगोदर नियुक्ती प्राधिकाऱ्यास लेखी कळविणे आवश्यक आहे.

(इ) प्रतिनियुक्तीच्या कालावधीत संबंधित अधिकाऱ्याला प्रतिनियुक्ती भत्ता देय असणार नाही. म.ना.से. (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा...इ.) नियम १९८१ मधील नियम ४० (परिशिष्ट दोन) व सामान्यः प्रशासन विभाग, शासन निर्णय, दिनांक १७-१२-२०१६ मधील तरतुदी विचारात घेऊन श्री. अनिल सोनवणे यांच्या प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्ती याबाबत महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी व कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाने ग्राम विकास विभागाशी सल्लामसलत करुन हाताळाव्यात.

(ई) श्री. अनिल सोनवणे यांच्या इतर सर्व प्रशासकीय बाबी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी व कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांचेमार्फत हाताळण्यात येतील.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२२१०१३१६०७५९६३०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नावाने व आदेशानुसार.

PRADEEP SAHEBRAO SHIVTARE

Digitally signed by PRADEEP SAHEBRAO SHIVTARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SKILL DEVELOPMENT AND ENTREPRENEURSHIP DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=be7f8a656a063523ecdbac5e75130d8b7a4674a77a2691e4bf21582d392883e9,
pseudonym=323361D01E3FB518718EE3AAAE55DB3EC668FBE8,
serialNumber=415BAA8242ED5D99644FE1533246B0A85DC3D52848FB6CE23F47DAF8D647AE5A, cn=PRADEEP SAHEBRAO SHIVTARE
Date: 2022.10.13 16:41:25 +05'30'

( प्रदिप शिवतरे )

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. प्रधान सचिव, कौ.रो.उ .व ना. विभाग, मंत्रालय, यांचे वरीष्ठ स्वीय सहायक,मुंबई.
२. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, सार्वजनिक बांधकाम भवन, मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई.
३. सह सचिव/उपसचिव, आस्थापना, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. सह सचिव/उपसचिव, आस्थापना, कौ.रो.उ.व ना. विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. श्री. अनिल सोनवणे, अतिरीक्त मु. का. अ. / प्रकल्प संचालक, ग्राम विकास विभाग.
६. निवडनस्ती/कौशल्य-१.